**3.2.1 Institution has created an ecosystem for innovations and has initiatives for creation and transfer of knowledge**

**Online Eloquence Competition**

## वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन (१६/०८/२०२१)

या. द. व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा तसेच तहसील कार्यालय तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने 15 ऑगस्ट 2021 चे निमित्त साधून 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा ऑनलाईन झूम मिटींगद्वारे घेण्यात आली. स्पर्धेमध्ये 18 विद्यार्थीनींनी भाग घेतला. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. निता गिरी होत्या. 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त या स्पर्धेचे आयोजन गृहअर्थशास्त्र विभाग तसेच तहसील कार्यालयाकडून करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक कु. अश्विनी कारवाडीया, द्वितीय क्रमांक कु. पायल पाटील, तृतीय क्रमांक कु. दुर्गा येडमाची तसेच कु. राधिका गाडगे हीला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. अशा प्रकारे स्पर्धा संपन्न झाली.




ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

## 1 ते 7 ऑगस्ट स्तनपान सप्ताह (०२/०८/२०२१)

गृहअर्थशास्त्र विभागामध्ये 2 ऑगस्ट 2021 रोजी 'स्तनपान सप्ताहाच'े आयोजन व त्यावर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शन म्हणून कु.

कोमल प्रधान (ग्रामीण रुग्णालय, तिवसा येथील परिचारिका) यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविका गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. निता गिरी यांनी केले. कार्यक्रमाची सुरूवात डॉ. उपाख्य पंजाबराव देशमुख तसेच सावित्रीबाईंच्या प्रतिमेला हारार्पण करून करण्यात आली. कु. कोमल प्रधान हिने स्तनपानाचे फायदे सांगितले तर आभार प्रदर्शन कु. धनश्री कुबडे हिने केले. कार्यक्रमाला प्रा. माधूरी धिवनरे, सौ. देशपांडे, कु. कोमल पाटील, साक्षी कुबडे, दर्शना निमकर उपस्थित होत्या.




## Nutrition Awareness Week 2021

## पोषण सप्ताहाचे आयोजन

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित या. द. व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा येथे 1 ते 7 सप्टेंबर दरम्यान पोषण आहाराचे आयोजन करण्यात आले होते. दि. 1 सप्टेंबर रोजी पोषण सप्ताहाचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. एन. जे. मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये 'डिश डेकोरेशन स्पर्धा, राजभाजी स्पर्धा तसेच पोषण सुंदरी स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. सुजाता सबाने तसेच सौ. अस्मीता मेश्राम उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या भाषणामधून पोषण आहाराचे महत्त्व समजावून सांगितले. पोषण सुंदरी स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये विद्यार्थीनींचे वजन, उंची आणि हिमोग्लोबीन तपासण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. जे. मेश्राम यांनी गृहअर्थशास्त्र विभागामध्ये होणाऱ्या विविध उपक्रमावर प्रकाश टाकला तसेच विद्यार्थीनींना

आहार विषयक मार्गदर्शन केले. गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. निता गिरी यांनी आभार प्रदर्शन केले. तसेच संचालन प्रा. नमिता कावलकर यांनी केले. कार्यकप्रमाला प्रा. हरमकर, प्रा. राऊत, प्रा. शिंदे, प्रा. गेडाम, प्रा. सोनटक्के, प्रा. सोळंके, प्रा. विघे, प्रा. इंदापवार, प्रा. कटाईत, प्रा. देशमुख तसेच कु. पायल पाटील, कु. साक्षी चवणे, कु. प्रतिक्षा आमले व इतर विद्यार्थीनी उपस्थित होत्या.




**पोषण सप्ताहाचे आयोजन**

## <u>Nutrition Awareness Week 2021</u>

**<u>रोजी पोषण आहार सुदृढ आरोग्य (०१/०४/२०२१)</u>**

1 एप्रिल 2021 रोजी पोषण आहार सुदृढ आरोग्य या विषयावर गृह अर्थशास्त्र विभागांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर मेश्राम सर यांनी विद्यार्थिनींची हितगुज साधले तसेच डॉक्टर नीता गिरी यांनी आरोग्य विषयक जागरूकता व आहारातील पोषण मूल्याचे महत्त्व सांगितले. बी.ए.भाग तीन च्या विद्यार्थिनींनी यावेळी विविध पदार्थाच्या माध्यमातून पोषणमूल्य कसं मिळते याविषयी प्रॅक्टिकल केले होते.




# अंगणवाडीला भेट (पोषण सप्ताह) (03/09/2021)

गृहअर्थशास्त्र विभागामध्ये पोषण सप्ताहामध्ये अंगणवाडीला भेट देण्यात आली. अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून या भेटीचे आयोजन करण्यात आले. पोलीस स्टेशन जवळील सोटागिर महाराजांच्या मंदिराजवळच्या अंगणवाडीमध्ये गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थीनींनी भेट दिली. तसेच तीथे लहान मुलांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून कविता, गाणे ऐकले तसेच त्यांच्याशी गप्पा मारल्या व स्वच्छतेचे महत्त्व सांगितले.



(03/09/2021)

**Visit to Anganwadi**

## केक कार्यशाळेचे आयोजन (३० एप्रिल २०२१)

यादव देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय तिवसा येथील गृह अर्थशास्त्र विभागांमध्ये 30 एप्रिल २०२१ रोजी केकच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले त्याकरता प्रशिक्षक म्हणून डॉ. कीर्ती गांधी ह्या आल्या होत्या .गृहशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थिनींनी त्यावेळी विविध प्रकारचे केक तयार करणे शिकले यामध्ये डॉल केक ,ब्लॅक फॉरेस्ट केक, जेली केक असे विविध प्रकारचे केक विद्यार्थिनी शिकले या कार्यक्रमाचे आयोजन गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.नीता गिरी यांनी केले होते त्याकरता प्रमुख अतिथी म्हणून सौ अस्मिता मेश्राम ह्या उपस्थित होत्या कार्यक्रमाच्या यशस्वी ते करता प्राचार्य डॉ. ऐन. जे.मेश्राम सर यांचे मार्गदर्शन लाभले तसेच कार्यक्रमाकरितासर्व विद्यार्थ्यांनी प्रयत्न केला कार्यक्रमाला धनश्री कुबडे, प्रियंका पल्हाड , कल्याणी सावरकर, प्राप्ती मनोहर तसेच गृह अर्थशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला.




30/04/2022

## Cake Making Workshop for Students



## Cake Making Workshop for Students



